# प्रेसनोट

दि. २२/०४/२०२३

बारामती शहर पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण येथील पोलीस शिपायावर लाच स्वीकारले प्रकरणी कारवाई.

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| गुन्हा नोंद क्रमांक | बारामती शहर पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण गु.र.नं. २३२/२०२३ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम ७. |
| तक्रारदार | पुरूष, वय - ३२ वर्षे |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | संतोष जगन्नाथ पवार, वय ३९ वर्ष, पोलीस शिपाई, नेमणुक - बारामती शहर पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ३,१५०/- रुपये |
| स्वीकारलेली लाच रक्कम | ३,०००/- रुपये |
| पडताळणी दिनांक | २१/०४/२०२३ |
| सापळा दिनांक | २१/०४/२०२३ |

ठिकाण :- बारामती शहर पोलीस स्टेशनचे आवारात, ता. बारामती, जि. पुणे.

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार यानी भाडयाने घेतलेल्या फ्लॅटसाठी दिलेल्या डिपॉजीटची रक्कम घरमालक परत देत नसल्याबाबतची तक्रार पोलीस विभागाच्या १०० नंबर वर डायल करुन केली होती. त्या तक्रारी संबंधाने पोलीस शिपाई संतोष पवार यानी पाठपुरावा केला, त्यासाठी पोलीसांचा वेळ गेला. त्याचा मोबदला / दंड म्हणून म्हणून लोकसेवक संतोष पवार यानी ३,१५०/- रुपये लाच मागणी केल्याची तक्रार तक्रारदार यांनी ला.प्र.वि. पुणे येथे दिली होती.

सदर तक्रारीची पडताळणी केली असता लोकसेवक संतोष पवार, पोलीस शिपाई यानी तक्रारदार यांचेकडे तडजोडीअंती ३,०००/- रुपयांची (तीन हजार रुपये) मागणी करुन, ती रक्कम स्वीकारल्यावर त्याना ताब्यात घेण्यात आले असून, बारामती शहर पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण येथे वरील प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

पोलीस शिपाई पवार याना अटक करून विशेष न्यायालय, बारामती येथे हजर केले असता मा. न्यायालयाने दि. २४/०४/२०२३ पर्यंत पोलीस कस्टडी रिमांड मंजूर केली आहे.

ला.प्र.वि. पुणे येथील पोलीस निरीक्षक प्रविण निंबाळकर तपास करत आहेत.

सदरची कारवाई मा.पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. सुरज गुरव, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

शासकीय अधिकारी, कर्मचारी / लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. अमोल तांबे,पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी केले आहे.

१. हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२. ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
४. व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी - पुणे **dyspacbpune@mahapolice.gov.in**
६. वेबसाईट - **www.acbmaharashtra.gov.in**
७. ऑनलाईन ॲप तक्रार - **www.acbmaharashtra.net.in**

(श्रीहरी पाटील)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.